पनवेल जिल्हा रायगड येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर सेंटरच्या अतिरिक्त विद्युत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः प्रशामा २०१८/प्र.क्र.८२/आरोग्य ३(अ)
१० वा मजला, संकुल इमारत,
मंत्रालय, जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २० एप्रिल, २०१८.

वाचा :

१) **सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये(राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय यांचे पत्र क्रमांक : संआसे/ कक्ष-३/टे-६/पनवेल उपजिरु व ट्रामा अति विद्युत/२७३८-३९/१८, दिनांक १६.०३.२०१८.**

प्रस्तावना :

आरोग्य सेवा संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये पनवेल जिल्हा रायगड येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर सेंटरच्या अतिरिक्त विद्युत कामासाठीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

२. पनवेल जिल्हा रायगड येथील १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व २० खाटांचे ट्रामा केअर सेंटर अतिरिक्त विद्युत कामाचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या दरसूचीवर आधारित असून वस्तु व सेवा कर १२ टक्के, आकस्मिक खर्च ४ टक्के व सेंटेज चार्जेस करिता ८ टक्के इ. सह रुपये २,९९,५८,७४९/- (दोन कोटी नव्याणव लक्ष अठावन्न हजार सातशे एकोणपन्नास फक्त) च्या अंदाजपत्रक व आराखड्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.
२) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.
३) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना आरोग्य खात्याच्या त्यात्या- आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.
४) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
५) उपरोक्त अंदाजपत्रकामध्ये यंत्रसामुग्रीचे Specification, संख्या, अंदाजित किंमत, इतर बाबी नमुद केलेल्या नाहीत. तरी निविदा प्रसिध्द करण्यापूर्वी त्याबाबतचा सविस्तर तपशील शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.
६) सदर कामे ई.निविदा पध्दतीने करुन घेण्यात यावीत.

कामाचा वाव खालील प्रमाणे आहे.

Sr.no.	Proposed Works	Cost(Rs.)
१	Providing fire fighting system	1,44,85,144/-
२	Providing DG set	37,18,541/-
३	Providing Air Conditioning in OT and ICU	51,86,982/-
४	Providing Solar water heater system	16,08,082/-
५	Providing PV system	29,14,000/-
६	Providing CCTV system	20,46,000/-

३. सदर कामासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक आर-१, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा ०१ - नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य) ११०-रुग्णालये व दवाखाने, (१)(अ)- पंचावार्षिक योजनातंर्गत योजना-इमारती, (००) (०१) - मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३ मोठी बांधकामे " यालेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १७९/१८/इमा-२ दि.२.४.२०१८ अन्वये प्राप्त सहमतीने व वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक- विअप्र २०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट, भाग पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक-१, परिच्छेद क्रमांक- १३४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२०११९५५३६७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.04.20 12:39:10 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय ग्रामीण अभियान, मुंबई.
३. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, मुंबई मंडळ, ठाणे
६. जिल्हा शल्य चिकित्सक,रायगड.

७. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, पनवेल, ता.पनवेल, जिल्हा-रायगड
८. कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
९. अधिक्षक अभियंता, रायगड, सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोकण भवन, नवी मुंबई.
१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर मुख्यालय-ठाणे
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जि.रायगड .
१२. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२/ ३), मंत्रालय, मुंबई.
१३. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवडनस्ती (आरोग्य-३अ).